

# ज्ञान आणि अभ्यासक्रम

भाग – २, सत्र – ४

डॉ. संध्या सामुद्रे

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी स्विकारलेल्या बी.एड्. च्या नवीन अभ्यासक्रमानुसार
द्वितीय वर्ष सत्र-४ करीता विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व अभ्यासकांना उपयुक्त

# ज्ञान आणि अभ्यासक्रम

भाग - २

# Knowledge and Curriculum
Part - II

डॉ. संध्या उद्धव सामुद्रे

नभप्रकाशन

ज्ञान आणि अभ्यासक्रम

- प्रकाशन क्र-२८५०
- प्रथमावृत्ती
  २६ नोव्हेंबर २०१८ (संकष्ट चतुर्थी)
- © डॉ. सौ. संध्या उद्धव सामुद्रे
  ६, लक्ष्मी अपार्टमेंट, संजीवनी हॉस्पिटल
  जवळ, दामले मार्ग, रामदासपेठ, अकोला.
  मो.- ९१३०८९४३३६
- प्रकाशक
  **मिलिंद डाहाके**
  नभ प्रकाशन,
  श्याम नगर, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती.
  मो.-७७९८२०४५००, ८१७७८३८४००
  Email-nabhprakashan@gmail.com
  Wec-www.nabhprakashan.com
- मुखपृष्ठ संकल्पना
  **राहुल कुमार**
- अक्षर जुळवणी
  **उमेश बावणकर**
- मुद्रक
  **'नभ प्रिंटर्स'**
  शाम नगर, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती.

- मूल्य-१५०/- रू.

**ISBN- 978-81-905776-61-1**

575

# अर्पण पत्रिका

अथक परिश्रम करून सुसंस्कारक्षम करणारी, प्रतिभेचा स्त्रोत असलेली
परमपुज्य माझी आई सौ. कुमुदिनी मकरंदे
व
पावलांना बळ देणारे व शिक्षणासाठी सदैव प्रेरणा स्त्रोत ठरलेले
माझे वडील श्री. श्रावणजी ग. मकरंदे
आणि
शैक्षणिक कार्यात प्रगती करण्यासाठी सदैव माझ्या पाठीशी असणारे माझे
पितृतुल्य सासरे श्री. शालीग्रामजी मा. सामुद्रे
व
मातृतुल्य सासूबाई सौ. शांताबाई शा. सामुद्रे
यांना सादर समर्पण

GOVT. COLLEGE OF EDUCATION
AKOLA - 444001
LIBRARY
(U. G. C. GRANT)
Acc'n No. 20575
Class No.
Date 23/1/19 Price 150/-

# मनोगत

सामाजिक परिवर्तन नित्य होत असते. त्यानुसार समाजाच्या मागण्या व गरजा यातही बदल होत असतो. या अनुषंगाने विद्यापीठांना अभ्यासक्रमात सतत बदल करणे क्रमप्राप्त ठरते. याच दृष्टिकोनातून N.C.T.E. 2014 च्या नियमानुसार बी.एड.चा अभ्यासक्रम २०१५ पासून दोन वर्षाचा झालेला आहे. एकूण अभ्यासक्रमाची रचना, अभ्यासक्रमातील विषयाकडे पर्यायाने शिक्षक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. विषयांची संख्या, विषयाचे स्वरूप यामध्ये आमुलाग्र बदल झालेला आहे. त्यामुळे नवीन अभ्यासक्रमानुसार संदर्भ ग्रंथनिर्मितीची आवश्यकता निर्माण झाली.

''ज्ञान आणि अभ्यासक्रम'' हा पुस्तकरूपी ग्रंथ विद्यार्थी देवतेला आणि आपणा सर्वांना समर्पित करताना मला अतिशय आनंद होत आहे. हे पुस्तक लिहिण्यामागे मुख्य हेतू हा की, या विषयाचे विद्यापिठीय अभ्यासक्रमाप्रमाणे पुस्तक उपलब्ध नाही. २०१५-१७ या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या विषयाचे पुस्तक आवश्यक आहे अशी सूचनावजा विनंती केली अन् या विषयाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांची ही मुख्य समस्या दूर करावी हा हेतू समोर ठेवून प्रस्तुत पुस्तक साकारले आहे. अध्ययन व अध्यापनाला उपयुक्त व परिणामकारक करण्यास पुस्तक निश्चित उपयोगी पडेल असा मला विश्वास आहे.

हे पुस्तक लिहिताना एका विशिष्ट विद्यापिठाचा विचार न करता सर्वच विद्यापीठातील विद्यार्थी व शिक्षकांना उपयुक्त ठरेल असा विचार केला. सर्व विद्यापिठाच्या नवीन अभ्यासक्रमाची पुनर्रचना २०१५-१६ पासून करण्यात आली. अत्यंत महत्त्वपूर्ण व नाविन्यपूर्ण सकारात्मक बदल नवीन अभ्यासक्रमामध्ये आहेत. सदर अभ्यासक्रमातील चवथ्या सत्रासाठी (द्वितीय वर्षात) ''ज्ञान आणि अभ्यासक्रम'' (Knowledge & Curriculum) हा पहिल्या क्रमांकाचा विषय ठेवण्यात आला आहे. अभ्यासक्रमातील सर्व घटकांचा समावेश क्रमबद्ध व मुद्देसुद करून पुस्तकातील आशय विस्तारण्याचा प्रयत्न केलेला आहे. या लेखनाला मूर्त

रूप मिळाले ते या पुस्तकाच्या रूपाने. हे पुस्तक विद्यार्थी देवतेला आणि आपल्या सर्वांना समर्पित करताना मला अतिशय आनंद होत आहे. सर्वच विद्यापिठातील विद्यार्थी, प्राध्यापक व या विषयाशी संबंधित अभ्यासक या सर्वांना या पुस्तकाचा निश्चितपणे लाभ होईल अशी आशा आहे.

विद्यार्थ्यांना व अभ्यासकांना, प्राध्यापकांना विषयाची सम्यक कल्पना यावी, त्यांना आवश्यक ती उपयुक्त माहिती मिळावी, त्यांच्या संकल्पना स्पष्ट व्हाव्यात या उद्देशाने हे पुस्तक लिहिले आहे.

ज्ञान आणि अनुभवाच्या प्रकाशात विद्यार्थी ज्ञानप्रविष्ट व अध्ययनशील व्हावा हा प्रयत्न याद्वारे केलेला आहे. भविष्याची आव्हाने पेलण्याचे वेध घेणारा व गतीशील अशा राष्ट्राचा समर्थ नागरिक विद्यार्थी व्हावा असा वैचारिक दृष्टिकोन या पुस्तकाद्वारे निर्माण होईल अशी खात्री आहे. सूर्यफूल ज्याप्रमाणे सूर्याच्या दिशेने प्रकाशाकडे वळते तसा भारतीय समाज ज्ञानाच्या दिशेने वळण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. अशी परिवर्तने घडून येत असलेल्या समाजाला ज्ञानाच्या रूंदावणाऱ्या कक्षांची जाणीव करून देणे, अभ्यासक्रमाची बदलती उद्दिष्टे, स्वरूप तसेच अभ्यासक्रमाचे बदलते आराखडे, त्यानुसार ज्ञानाचे स्वरूप, मार्ग, ज्ञानाची रचना याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करणे, अभ्यासक्रमाची रचना व विविध शालेय स्तर, अभ्यासक्रमाचे मूल्य निर्धारण व त्याचे मार्ग, समाजाची व इतर क्षेत्राची मागणी व गरज, त्यानुसार अपेक्षित बदल, समाज, शिक्षक, विद्यार्थी व इतर संघटना, तज्ञ यांचेकडून आवश्यक प्रत्याभरण, अभ्यासक्रमात अपेक्षित बदल यासंबंधिचे विस्तृत विवेचन या पुस्तकाचा विषय आहे.

शिक्षक हा बदलाचा अग्रदुत असतो ! म्हणून विद्यार्थी शिक्षकांना या पुस्तकाद्वारे एक निश्चित दिशा मिळेल असा मला विश्वास वाटतो. पुस्तकाचे शेवटी प्रश्नपेढी दिलेली आहे. ह्याचा निश्चितच विद्यार्थ्यांला लाभ होईल.

सदर पुस्तकाच्या निर्मितीत अनेक मान्यवरांची प्रेरणा मिळाली. विविध संदर्भ, ग्रंथालये, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांचीही मदत झाली. या सर्वांची मी मनस्व ऋणी आहे. माझे कुटुंबिय, मित्र मैत्रिण या सर्वांच्या प्रति ऋण निर्देश करणे हे माझे कर्तव्य आहे.

सदर पुस्तकाचे प्रकाशन नभ प्रकाशन, अमरावतीचे श्री. मिलिंद डाहाके यांनी अत्यंत अल्पावधीत पुस्तकाला आकर्षण स्वरूप देऊन प्रकाशित केले त्याबद्दल त्यांचे आभार मानणे अगत्याचे आहे.

सदर पुस्तक आपल्याला आवडेल व आपल्या अभ्यासू अपेक्षांची पूर्ती करेल या अपेक्षेने आपल्या हाती देत आहे. तरीही काही उणिवा असल्यास आपण अवश्य कळवावे. आपल्या सूचनांचा विचार करून पुढच्या आवृत्तीत तसे बदल करण्यात येतील.

या पुस्तकाचे सर्वत स्वागत होईल अशी आशा बाळगते. आपणा सर्वांचे सहकार्य, आशीर्वाद व प्रेरणा देऊन प्रोत्साहित केल्यास लेखनप्रवास अधिक समृद्ध होईल.

धन्यवाद !

**– डॉ. सौ. संध्या उद्धव सामुद्रे**

# अनुक्रमणिका

प्रकरण १ ले
अभ्यासक्रमाची संरचना ७
प्रकरण २ रे
अभ्यासक्रमाचे पैलू १९
प्रकरण ३ रे
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा ३७
प्रकरण ४ थे
शाळा–अभ्यासक्रम अनुबंध वाहिनी ५७
प्रकरण ५ वे
अभ्यासक्रम व त्याचे मूल्यनिर्धारण ११३

## Contents

Chapter - I
Curriculum Framework 7
Chapter - II
Aspects of Curriculum 19
Chapter - III
National Curriculum Framework 37
Chapter - IV
School - The site of Curriculum Engagement 57
Chapter - VI
Curriculum and its Assessment 113

## प्रकरण – १ अभ्यासक्रम संरचना

१. प्रास्ताविक

२. अभ्यासक्रमाची संरचना – संकल्पना व गरज

३. अभ्यासक्रमाची संरचना, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यातील फरक

४. संरचना, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांचे शालेय शिक्षणातील महत्त्व.

## Chapter - 1 Curriculum Framework

1. Introduction
2. Curriculum Framework - concept and need
3. Difference between curriculum Framework, Curriculum and syllabus
4. Significance of framework, curriculum and syllabus in school education.

प्रकरण १ ले

# अभ्यासक्रमाची संरचना

**प्रास्ताविक :**

विद्याशाखेचा उदय होताना सुरूवातीला नवीन विद्याशाखा ही मूळ विद्याशाखेची एक उपशाखा म्हणून उदयास येते किंवा एकापेक्षा जास्त विद्याशाखा एकत्र येऊन एखाद्या क्षेत्रात अभ्यास करतात व नवीन आंतरज्ञानशाखीय विद्याशाखा तयार होते. काही वेळेस एकापेक्षा जास्त विद्याशाखा एकत्र येऊन अन्य स्वतंत्र विद्याशाखेत रूपांतर होण्यासाठी किंवा स्वतंत्र स्थान मिळविण्यासाठी काही खास वैशिष्ट्ये प्राप्त करावी लागतात.

**अभ्यासक्रमाची संरचना/आराखडा : (Curriculum Framework)**

**संकल्पना :**

वेगवेगळ्या पृच्छा पद्धतीच्या वापरातून प्रत्येक विद्याशाखा मोठ्या प्रमाणात ज्ञाननिर्मिती करीत असते. या ज्ञानात तपशील, संकल्पना, तत्त्वे, सिद्धांत, नियम, सूत्रे, संकेत, आत्माविष्कार, रचना, प्रक्रिया, पद्धती, मध्यवर्ती कल्पना, कौशल्ये, अर्थनिर्वचने आणि सृजनात्मक निर्मिती इत्यादी गोष्टी समाविष्ट होतात. येथे अत्यंत व्यापक अशा ज्ञान संचयाची पद्धतशीररित्या रचना करणे आवश्यक असते. त्यामुळे ते ज्ञान नवीन पिढीत संक्रमित करणे सोपे जाते किंवा संशोधनाद्वारे त्या ज्ञानात भर टाकण्यास मदत होते.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान संक्रमित करण्यासाठी या ज्ञानाच्या संचयातील कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या, असा प्रश्न उपस्थित होतो.

जेरोम ब्रुनरच्या मते, तपशील किंवा माहितीपेक्षा संकल्पना, तत्त्वे, मध्यवर्ती कल्पना आणि त्यांच्यातील परस्पर संबंध याला अध्यापनात जास्त महत्त्व असले पाहिजे.

''एखाद्या विद्याशाखेच्या मूलभूत कल्पना, संकल्पना, विविध संकल्पनांतील परस्परसंबंध आणि तत्त्वे यांच्या आधारे केलेल्या मांडणीला 'संरचना' असे म्हणता येईल. ब्रुनर म्हणतो की, अशा मूलभूत कल्पना, संकल्पना आणि तत्त्वे शिकल्यामुळे त्यांचा उपयोग विद्यार्थी एकापेक्षा अधिक घटक शिकण्यासाठी करू शकतात आणि परिणामकारक अध्ययनास मदत होते.

आसुबेल या मानसशास्त्रज्ञाच्या मते, विषयवस्तूचे ज्या पद्धतीने संघटन केले

जाते त्याला 'अभ्यासक्रमाची संरचना' असे म्हणता येईल. ते ज्ञान शिकल्यापुढे शिकणाऱ्याच्या मनामध्ये ते ज्या पद्धतीने संघटित होते त्याला 'बोधात्मक संरचना' असे म्हणतात. अभ्यासक्रमाची ही संरचना आणि शिकणाऱ्याच्या मनातील ज्ञानाची संरचना ह्या एकमेकांस समांतर असतात, असे ते म्हणतात.

अभ्यासक्रमाच्या संरचनेत संकल्पना आणि तत्त्वेही श्रेणीबद्ध पद्धतीने रचलेल्या असतात. ही रचना साधारणपणे एखाद्या पिरॅमिडसारखी असते. पिरॅमिडच्या शिखराशी असलेल्या संकल्पनांची संख्या मर्यादीत किंवा कमी असते. परंतु त्या शिखर संकल्पना ह्या अधिक व्यापक असतात. तसेच त्यांची अमूर्तता अधिक असते. एका व्यापक संकल्पनेखाली अनेक कमी व्यापक, कमी अमूर्त अशा उपसंकल्पना येतात, त्या उपसंकल्पनांच्याही आणखी उपसंकल्पना असू शकतात. त्यांची संख्या जास्त असल्याने ह्या पिरॅमिडचा पाया विस्तृत होत जातो. तळाशी असणाऱ्या संकल्पना किंवा तपशील हा अधिक मूर्त स्वरूपाचा असतो.


अभ्यासक्रमाची संरचना ही परस्परसंबंधावर आधारलेली असते. संकल्पना आणि उपसंकल्पना यांच्यात हा परस्परसंबंध श्रेणीबद्ध (उभा) असतो. तशीच एक संकल्पना दुसऱ्या संकल्पनेशी त्यातील परस्पर संबंधाने (आडवा) निगडीत असते. ती तत्त्वे किंवा नियमांच्या आधाराने जोडलेली असतात. अनेक परस्परसंबंधी तत्त्वातून उपपत्ती तयार होतात.

जसजशी ज्ञानशाखा विकसित होत जाते तसतशी अभ्यासक्रमाच्या संरचनेची गुंतागुंत वाढत जाते. आजवर प्रत्येक अभ्यासक्रमात इतके ज्ञान संचयित झाले आहे की एखाद्या अभ्यासक्रमाच्या संपूर्ण संरचनेचे आकलन होणे केवळ अशक्य झाले आहे. त्यामुळे शिकताना विशेषीकरणाला महत्त्व प्राप्त झालेले दिसते. एखादी व्यक्ती एखाद्या उपशाखेत विशेषीकरण करते. याचाच अर्थ ती कमीतकमी गोष्टीचे जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करते. म्हणजेच त्या व्यक्तीला त्या उपशाखेची संरचना अत्यंत तपशिलासह सुक्ष्मा व गुंतागुंतीसह ज्ञात होते. जितका व्यक्तीचा व्यासंग, अभ्यास जास्त तेवढे अभ्यासक्रम संरचनेचे आकलन अधिक व सखोल असते.


अभ्यासक्रम विकासाचा मार्ग किंवा तो कसा विकसित होत जाईल ह्याची दिशा ही निश्चितपणे ठरवता येत नाही. काही वेळेस एखाद्या वृक्षाला जशा अनेक फांद्या व उपफांद्या फुटतात तशा ज्ञानशाखा विस्तारत जातात. एखादी विद्याशाखा आडव्या उभ्या धाग्यांनी जोडलेल्या जाळी प्रमाणे विकसित होऊ शकते किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे

शक्वा कृतीही असू शकते. मुळात सर्व अभ्यासक्रमाच्या विद्याशाखांच्या संरचनेचे आकलन केवळ अशक्य असल्याने आपल्याला प्राप्त असलेल्या ज्ञानाच्या आधारे आपण संरचनेची अशी मांडणी केली पाहिजे की, ती नव्या पिढीला म्हणजेच विद्यार्थ्याला सहजासहजी समजू शकेल. त्यामुळे अभ्यासक्रमाच्या संरचनेची मांडणी आपापल्या आकलनाप्रमाणे थोडीफार वेगळी होऊ शकेल. उदा. विज्ञानाच्या संरचनेतील जीवशास्त्र या विभागाचा अभ्यास केला तर जीवशास्त्रातील प्राणीशास्त्र ही संकल्पना अमूर्त संकल्पना आहे. परंतु प्राणीशास्त्राच्या खालोखाल येणाऱ्या संकल्पना मात्र मूर्त होत जातात.

**उदाहरणादाखल काही विषयाच्या संरचना**




**आकृती क्र. १.१ इतिहासाची संरचना**




**आकृती क्र. १.२ विज्ञानाची संरचना**

**चांगल्या संरचनेचे निकष : (Criteria of good framework)**

प्रत्येक शिक्षकाचे संरचनेविषयीचे आकलन, शिक्षकाला स्वत:ला अध्यापनासाठी आणि विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशा तऱ्हेने संरचना मांडता येतात. त्यामुळे एकाच विषयाच्या किंवा विद्याशाखेच्या अनेक संरचना होऊ शकतात. यासाठी चांगल्या संरचनेचे निकष शिक्षकाला माहिती असणे आवश्यक आहे.

१. संरचना ही बहुव्यापी किंवा जास्तीत जास्त समावेशक अशी असावी.
२. ती स्वत:च्या व इतरांच्या आकलनाच्या दृष्टीने सोपी व सुटसुटीत असावी.
३. ती अर्थपूर्ण असावी.
४. ती तार्किक किंवा मानसशास्त्रीय संबंधावर आधारलेली असावी.
५. मध्यवर्ती संकल्पना/कल्पना तत्काळ सुस्पष्ट करणारी असावी.

**अभ्यासक्रमाच्या संरचनेची गरज : (Need of curriculum framework)**

शिक्षकाला त्याच्या विषयाचे अध्यापन करण्यापूर्वी त्या विषयातील पाठ्यांश, इतर ज्ञानशाखेशी त्याचा संबंध, ज्ञानशाखेतील घटक याबाबत माहिती असणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षकाला अभ्यासक्रमाची संरचना अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते.

१. पाठ्यविषयाच्या ज्ञानशाखेशी असलेला संबंध संरचनेमुळे शिक्षकाला माहिती होतो. संरचनेमुळे त्या विद्याशाखेचा विस्तार व व्याप्ती समजते.
२. ज्ञानशाखेतील घटक व पाठ्यविषयातील घटक यातील सारखेपणा लक्षात येतो.
३. ज्ञानशाखेतील घटकांशी तसेच इतर ज्ञानशाखेशी त्या आशयाचे एकात्मीकरण करणे सोपे जाते.
४. विद्यार्थ्यांना ज्ञान हे एकत्व व एकजिनसी आहे, याची कल्पना येऊन शिकविलेला आशय ते दैनंदीन व्यवहारात विविध ठिकाणी वापरू शकतात.
५. संरचनेमुळे शिक्षकाला ज्ञानशाखेची वैशिष्ट्ये माहिती होतात. त्यामुळे शिक्षक आपल्या अध्यापनात ती परावर्तित करू शकतात.
६. शिक्षकाला त्याच्या विद्याशाखेचे शाखा, उपशाखा, घटक, उपघटक लक्षात ठेवण्यासाठी तसेच त्यातील परस्परसंबंधाचे आकलन होण्यासाठी आपल्या विषयाची संरचना माहीत असायला हवी.
७. शिक्षक एखादा पाठ्यविषय शिकवितो, त्यावेळी तो पाठ्यविषय व त्यातील घटक यांचा एकमेकांशी आणि विद्याशाखेतील अन्य घटकांशी काय व कसा संबंध आ

हे जर शिक्षक मुलांना समजावून सांगू शकले तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढण्यावर होत असतो.

**संरचनेची वैशिष्ट्ये : (Characteristics of framework)**

जेरोम ब्रुनर म्हणतो, 'कुठल्याही ज्ञानावर प्रक्रिया झाल्यावर त्याची विशिष्ट रचना तयार होते. रचनेत अनेक घटक असतात. सर्व घटक एकमेकांशी संबंधित असतात. त्याचप्रमाणे आपण जर ज्ञान देताना संरचित स्वरूपात दिले तर ते अधिक उपयोगी, अर्थपूर्ण होईल.'

**संरचनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील :**

१. संरचनेत त्या त्या विषयाशी संबंधित जास्तीत जास्त घटकांचा समावेश असतो.
२. त्या घटकांचे एकमेकांशी संबंध असतात.
३. त्या घटकांची एक विशिष्ट मांडणी किंवा रचना असते.
४. संबंधित विषयातील प्रत्येक आशय घटकाचे संरचनेच्या साहाय्याने स्थान निश्चित करता येते.
५. ही संरचना शक्य तितकी आटोपशीर (Compact)असावी.

प्रश्नपेढी

## घटक IV : अभ्याक्रम संरचना

१. अभ्यासक्रम म्हणजे काय ते सांगून अभ्यासक्रम आराखड्याचे /संरचनेचे महत्त्व सांगा.

२. अभ्यासक्रमाची संकल्पना स्पष्ट करून अभ्यासक्रमाची गरज सोदाहरण स्पष्ट करा.

३. अभ्यासक्रम संरचनेची गरज सांगून तुमच्या अध्यापन पद्धतीची संरचना स्पष्ट करा.

४. अभ्यासक्रम संरचना व अभ्यासक्रम यातील फरक सोदाहरण स्पष्ट करा.

५. पाठ्यक्रम म्हणजे काय? अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यातील फरक स्पष्ट करा.

६. शालेय शिक्षणात अभ्यासक्रम संरचनेचे महत्त्व व गरज स्पष्ट करा.

७. 'शालेय शिक्षणात अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरतो' हे विधान स्पष्ट करा.

८. 'शालेय शिक्षणात पाठ्यक्रमा स्पष्ट करा.

१५. शालेय स्तरावर अभ्याक्रमाचे महत्त्व स्पष्ट करा.

१६. शालेय स्तर व वर्ग स्तरावरील अभ्यासक्रमातील साम्यभेद सोदाहरण स्पष्ट करा.

१७. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ची वैशिष्ट्ये सांगा.

१८. शिक्षक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०१४ ची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

१९. पाठ्यक्रम हा अभ्यासक्रमावर आधारित असतो तर अभ्यासक्रम आराखड्यानुसार अभ्यासक्रम असावा, आपले मत स्पष्ट करा.

# घटक V शाळा : शालेय अनुबंधाची वाहिनी

२०. अभ्यासक्रम निर्मितीची प्रक्रिया सांगा.

२१. अभ्यासक्रमाचे घटक सोदाहरण स्पष्ट करा.

२२. अभ्यासक्रमातील घटकांचे शिक्षकाच्या दृष्टिने महत्त्व विषद करा.

२३. अभ्यास निर्मितीमध्ये राज्याची भूमिका स्पष्ट करा.

२४. अभ्यासक्रम निर्मितीमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांची भूमिका स्पष्ट करा.

२५. अभ्यासक्रम रचनेची प्रक्रिया सांगा.

२६. अभ्यासक्रम रचना प्रक्रियेत ध्येये आणि उद्दिष्टांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. चर्चा करा.

२७. ज्ञान निवडीचे निकष सांगा.

२८. अभ्यासक्रम रचना प्रक्रियेत ज्ञान निवडीचे महत्त्व सांगा.

२९. अभ्यासक्रम रचनेत अध्ययन स्थितीची निवड व संघटन स्पष्ट करा.

३०. अभ्यासक्रम रचनेत मूलभूत संकल्पनांचे संघटन करणे आवश्यक ठरते. आपले मत स्पष्ट करा.

३१. अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी उपलब्ध अंतर्गत सोयीसुविधा कोणत्या ? सोदाहरण स्पष्ट करा.

३२. अभ्यासपूरक वाहिन्या व स्त्रोत सांगून अभ्यासक्रमाच्या पूर्ततेत त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

३३. 'ग्रंथालय व प्रयोगशाळा' हे अभ्यासपुरक स्त्रोत आहेत या विधानाची चर्चा करा.

३४. 'सामाजिक गट हा अभ्यासपुरक स्त्रोत ठरतो' या विधानाचा परामर्श घ्या.

३५. शालेय मैदान व शेजारी या अभ्यासपुरक स्त्रोतांचे महत्त्व विशद करा.

३६. अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी उपलब्ध अंतर्गत सोयीसुविधा कोणत्या? त्यापैकी कोणत्याही एका सोयीसुविधेचा शिक्षक म्हणून आपण कसा उपयोग कराल?

## घटक VI : अभ्यासक्रम व त्याचे मूल्यनिर्धारण

३७. मूल्यनिर्धारण ही संकल्पना स्पष्ट करा.

३८. 'अभ्यासक्रमाचे मूल्यनिर्धारण करणे गरजेचे आहे' आपले मत स्पष्ट करा.

३९. क्षेत्रीय गरजानुसार अभ्यासक्रम असावा, चर्चा करा.

४०. क्षेत्रीय गरजानुसार अभ्यासक्रमात बदल होणे गरजेचे आहे. मत स्पष्ट करा.

४१. अभ्यासक्रम परिक्षणाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

४२. RTE कायदा २००९ मधील बाबी स्पष्ट करा.

४३. अभ्यासक्रमाविषयी प्रत्याभरणाची गरज स्पष्ट करा.

४४. विद्यार्थी आणि शिक्षक यांचेकडून प्रत्याभरण गरजेचे आहे, चर्चा करा.

४५. प्रत्याभरण म्हणजे काय? ते सांगून समाजाकडून प्रत्याभरणाची आवश्यकता विषद करा.

४६. प्रशासकाकडून प्रत्याभरण गरजेचे आहे. मत स्पष्ट करा.

४७. अभ्यासक्रमाचे मूल्यनिर्धारण आणि प्रत्याभरण यातील संबंध स्पष्ट करा.

४८. 'अभ्यासक्रमाचे परिक्षण करणे आवश्यक आहे' शिक्षक म्हणून आपली भूमिका स्पष्ट करा.

४९. 'स्पर्धात्मक दृष्टिने अडथळा/रोखणे नाही व निवड नाही' या विधानाचा परामर्श घ्या.

५०. 'अभ्यासक्रमाचे मूल्यनिर्धारण शिक्षकाला एक आव्हान ठरते' स्पष्ट करा.

GOVT. COLLEGE OF EDUCATION
AKOLA - 444001
LIBRARY
(U. G. C. GRANT)
Acc'n No. 20575
Class No.
Date 23/1/19 Price 150/-

# संदर्भ ग्रंथ सूची

१. आंगले, भिकू पै. (२००३), शैक्षणिक सप्तस्तर. गोवा : लक्ष्मी प्रकाशन, मडगाव.

२. उपासनी ना. के. आणि कुळकर्णी, के.वि. (१९८७), यशस्वी अध्यापन. पुणे : श्री विद्या प्रकाशन.

३. उपासनी ना. के. (२००७), अध्यापन साधना. पुणे : श्री विद्या प्रकाशन.

४. शिवणेकर ल. मा. (२००९), अध्यापक भूमिका व कार्ये, पुणे : नित्य नुतन प्रकाशन.

५. सामुद्रे संध्या उद्धव (२०१३), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण (समाजजशास्त्रीय भूमिका) नागपूर : श्री मंगेश प्रकाशन

६. संपादक : शिक्षकांचे प्रशिक्षण, शिक्षक हस्तपुस्तिका, (२०१२), पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

७. संपादक : शिक्षण संक्रमण, जुलै २०१५ पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

इंटरनेट

1. https.en.m.wikepedia.org
2. https://en.m.wikepedia.org>wiki>national
3. Mhrd.gov.in>upload-document
4. www.ncert.nic.in>pdf>english
5. www.your article library. com>education

## नभप्रकाशनची या वर्षातील प्रकाशित पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. अखेर | – | डॉ. मधुकर गोटे |
| २. भारताचा इतिहास | – | प्रा.डॉ. सिद्धार्थ वाठोरे |
| ३. शिदोरी संस्काराची... | – | प्रफुल अकोलकर |
| ४. आधुनिक भारताचा इतिहास | – | प्रा.डॉ. सिद्धार्थ वाठोरे |
| ५. हवामान शास्त्र | – | प्रा.डॉ. अरूणा पाटील |
| ६. अध्ययन आणि अध्यापन | – | डॉ. विद्या शिंगाडे |
| ७. अध्ययन आणि अध्यापन | – | प्रा.डॉ. गोकुल डामरे |
| ८. समिक्षेची विचारशिल्पे | – | डॉ. गणेश टाले |
| ९. तंटामुक्तीतून समृद्धीकडे | – | प्रा.डॉ. बबीता हजारे |
| १०. जाणिवाचं प्रगल्भ क्षितीज | – | प्रा.डॉ. बबीता हजारे |
| ११. संत एकनाथ महाराजाच्या अलौकीक गोष्टी | – | डॉ. अभिमन्यु मगर |
| १२. साहित्यलेख | – | प्रा.डॉ. चंदु पाखरे |
| १३. गृहविज्ञान | – | डॉ. निलीमा बर्गट, डॉ. सीमा बर्गट |
| १४. विद्वत्भाष्य | – | डॉ. ज.पां. खोडके |
| १५. नरखेड तहसिलमधील शेतीची भूमिउपयोजन | – | प्रा.डॉ. नारायण सोनुले |
| १६. खवातीन के महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर | – | रजिया सुलताना |
| १७. गृहअर्थशास्त्र | – | प्रा.डॉ.कल्पना कोरडे |
| १८. तनकट | – | प्रा.डॉ. भाष्कर काळे |
| १९. माझे जीवण गाणे | – | शाहीर ईश्वर मगर |
| २०. आकाशातील उंच भरारी | – | कु. अश्विनी कडू |
| २१. निवडक राज्यघटना आणि आंतरराष्ट्रीय संबंध | – | प्रा.डॉ. व्ही.एच.भटकर |
| २२. चीनची शासन व्यवस्था आणि संयुक्त राष्ट्रे | – | प्रा.डॉ. व्ही.एच.भटकर |
| २३. संघर्षाच्या वाटा | – | सुरेश पी. आटोटे |
| २४. सहज सुचलं म्हणून | – | गोविंद फसाटे |
| २५. व्यावसायीक अंकगणित | – | प्रा.डॉ. बाळकृष्ण इंगळे |
| २६. Health Values | - | Dr. Savita M. Kene |
| २७. Sane Guruji | - | Dr. Archana Bobade |



## डॉ.सौ.संध्या उद्धव सामुद्रे

सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

* अध्यापन अनुभव : २४ वर्षे
* समन्वयक : बी.एड्. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक द्वारा संचलित बी.एड्. एम.एड्., एम.फील. व शालेय व्यवस्थापन पदविका (डी.एस.एम.) अभ्यासक्रमाचे मान्यताप्राप्त समंत्रक
* संशोधन मार्गदर्शन : पीएच.डी., एम.एड्., एम.फील., डी.एस.एम.
* आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरीय विविध विषयावर आधारित चर्चासत्र, परिषद व कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग.
* विविध विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन.
* विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालिकामध्ये शोधनिबंध प्रकाशित.
* विविध नियतकालिके व दैनिक वृत्तपत्रांमधून लेख प्रसिद्ध.
* विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत लघु संशोधन प्रकल्प पूर्ण. सी.टी. ई. अंतर्गत गणित कार्यशाळेचे यशस्वी आयोजन.
* महाराष्ट्र शासन पुरस्कृत 'जागर जाणिवांचा' या अभियानांतर्गत 'महिला सक्षमीकरण' या कार्यशाळेचे समन्वयक व इतर उपक्रमामध्ये सहकार्य.
* अमरावती विद्यापीठांतर्गत विभागस्तरीय बी.एड्. अभ्यासक्रम पुनर्रचना कार्यशाळेत अभ्यासक्रम विषयक मार्गदर्शन, सूचना सक्रिय सहभाग. * माजी विद्यार्थी संघटनेद्वारे पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांच्या संशोधनावर आधारित 'गरूडझेप पुस्तिकेचे' संपादन.
* महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक शिक्षण संघटना परिषदेत उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार.
* एम.एस.एसी.आय.टी. फॉर टीचर्स या अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य.
* अकोला आकाशवाणी वर 'शब्दलोक' या कार्यक्रमात 'मर्म जीवनाचे' या विषयावर आधारित भाषण.

पुस्तक लेखन :

* १. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण (समाजशास्त्रीय भूमिका)
* २. माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान ही दोन्ही पुस्तके संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती च्या बी.एड्., अभ्यासक्रमात समाविष्ट.

नभप्रकाशन
Shyam Nagar, Amravati-444606
Mob.- 7798204500, 9923145400

ISBN- 978-81-905776-60-1